| | |
|---|---|
| महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | **जनसंपर्क अधिकारी**<br>पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय<br>रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे<br>फोन.नं. ०२२-२९४५१००१<br>Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in |

प्रेस नोट क्र १३०

दिनांक- २०/०५/२०२१

**अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने वेश्या व्यवसायावर कारवाई करुन ०१ अल्पवयीन मुलगी व इतर ०२ पिडीत मुलींची सुटका केली.**

दिनांक १९.०५.२०२१ रोजी नयानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रु.नं.२०४,बिल्डीग नं.सी-४९, सत्यदीप बिल्डीग, शांतीनगर, मिरारोड पूर्व या ठिकाणी राहणारी महिला वेश्यादलाल ही गि-हाईकाकडून वेश्यागमनाचा मोबदला घेवून मुलींना वेश्याव्यवसायासाठी बाहेर पाठविते तसेच स्वतःचे रहाते घरी देखील जबरदस्तीने मुलीनां वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडते अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील यांनी पथकासह नमुद ठिकाणी छापा टाकला असता महिला वेश्यादलाल दलविन्दकौर राजुसिंग भारज वय ५२ वर्ष ही वेश्यागमनासाठी ग्राहकांकडुन पैसे स्वीकारुन त्या मोबद्दल्यात अल्पवयीन मुली पुरवित असल्याचे निष्पन्न झाले.तिचेकडून वेश्यगमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह तिला ताब्यात घेवुन ०१ अल्पवयीन मुलगी व इतर ०२ मुलींची सुटका करण्यात आली.

सदर बाबत महिला वेश्यादलाल हीस अटक करुन तिचेविरुध्द नयानगर पोलीस ठाणे येथे पो.हवा./२२६९ उमेश पाटील यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ३२१/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३६६(अ), ३७० सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५,७ सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८,१२,१८ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील,पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख,सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, पो.हवा./२२६९ उमेश पाटील, पो.हवा.१६३ रामचंद्र पाटील, पो.शि./३६६० शिंदे तसेच भाईंदर पोलीस ठाण्याचे नेमणुकीतील मपोशि.१३३७ गवस यांनी केली आहे.